महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

'प्रकाशगड', स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१
दूरध्वनी : (थे) ६५४३७५३ (का) ६४२२२११ फॅक्स : (०२२) ६४५५२३७


क्रमांक:कामगार/ब/४/ ६५७५ दिनांक : ९ फेब्रुवारी १९९८.

## परिपत्रक

विषय- कर्मचारी कल्याण निधी समिती--अधिकारी /कर्मचा-यांच्या पाल्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करणेबाबत.

---

कर्मचारी कल्याण निधी समितीच्या दिनांक १८-१२-९७ रोजी झालेल्या २९ व्या बेठकीत खालील निर्णय घेण्यात आला.

मार्च १९९७ मध्ये माध्यमिक शालांत परिक्षा उत्तिर्ण होणा-या व विशेष गुणवत्ता प्राप्त करणा-या अधिकारी/कर्मचा-यांच्या पाल्यास देण्यात येणारी शिष्यवृत्ती दरमहा रु.७५ ऐवजी रु.१००/-अशी वाढविण्यात आलेली आहे. हा वाढीव दर शैक्षणिक सत्र सन १९९७-९८ पासून कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

तसेच, ज्याअधिकारी/कर्मचा-यांच्या पाल्यांना यापूर्वी शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे आणि शिष्यवृत्ती पूढे चालू ठेवण्यास पात्र आहेत अशा पाल्यांना रु.१००/- प्रतिमाह या सुधारित दराने १९९७-९८ या शैक्षणिक सत्रापासून शिष्यवृत्ती देय राहिल. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षाकरिता रु.७५/- प्रतिमाह दराने शिष्यवृत्ती अदा केली असेल त्या पाल्यांना रु.२५/-प्रतिमाह या दराने शिष्यवृत्तीच्या फरकाची रक्कम देण्यात यावी.

सदस्य, सचिव(क.क. निधी समिती ) व
मुख्य औद्योगिक व संबंध अधिकारी.

प्रति: प्रेषण यादीनुसार सर्वांना.

gad/